# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ, अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्यविद्यापीठ)

## पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली, जि. गडचिरोली

जा. क्र./गोविग/पशैवि/३०७/२०२६ दि. १३/१०/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी
संलग्नित सर्व महाविद्यालये

**विषय :– दिनांक ०७ डिसेंबर, २०२६ रोजी झाडीबोली नाट्यसंमेलनील स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयातील एकांकिका पाठवून सहभाग नोंदविण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सुचित करण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दि. ०७ डिसेंबर, २०२६ रोजी मा. कुलगुरू महोदय डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाने झाडीबोली नाट्यसंमेलनाचे (वर्ष ३ रे) आयोजन करण्यात येत आहे. आयोजित झाडीबोली नाट्यसंमेलनाकरिता आपल्या महाविद्यालयातील एक एकांकिका व एकपात्री अभिनय व अन्य स्पर्धेसाठी दि.३० /१०/२०२६ रोजी पर्यंत पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे सहभागी स्पर्धकांची नावे पाठविण्यात यावे. तसेच सदर संमेलनामध्ये सहभागी होण्याकरिता विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे व महाविद्यालयाद्वारे त्यांचा सहभाग नोंदविण्याची कार्यवाही घेवून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत करावा.

सहपत्रः– नाटयसंमेलनाचे प्रारूप

**मा. प्र–कुलगुरू यांच्या आदेशान्वये**

For
[signature] 13/10/26

HoD
P.G.T.D. of Marathi
Gondwana University, Gadchiroli

डॉ. सविता गोविंदवार
विभाग प्रमुख,
पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## —:कार्यक्रमाची रूपरेषा:—

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभागअंतर्गत झाडीबोली नाट्यसंमेलन (वर्ष ३ रे) आयोजन करण्यात येत आहे. झाडीपट्टीतील सामाजिक समस्या, झाडीपट्टीतील परंपरागत लोककला, भाषा बोली, आचार–विचार व संस्कृती यांची ओळख व अभ्यास करण्याच्या दृष्टीने आणि झाडीपट्टी रंगभूमीचे जतन व संवर्धन करणे या उद्देशाने मा. कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या मार्गदर्शनाने गोंडवाना विद्यापीठातंर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने दिनांक **०७ डिसेंबर, २०२६ रोजी** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे झाडीबोली नाट्यसंमेलन होत आहे. तरी या नाट्यसंमेलनात होणाऱ्या विविध उपक्रमात गोंडवाना विद्यापीठातंर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयातील (चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा) विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा व जास्तीत जास्त संख्येने विविध उपक्रमांत सहभागी व्हावे असे सूचित करण्यात येत आहे.

### झाडीबोली नाट्यसंमेलन

**स्वागताध्यक्ष** — डॉ. प्रशान्त बोकारे, मा. कुलगुरू गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**सहस्वागताध्यक्ष** — डॉ. श्रीराम कावळे, मा. प्र—कुलगुरू गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**उद्घाटक** —

**झाडीबोली नाट्यसंमेलन अध्यक्ष** —

**प्रमुख अतिथी** —

**प्रमुख उपस्थिती** —

**मराठी विभाग प्रमुख** — डॉ. सविता गोविंदवार, प. शै. मराठी विभाग, गो.वि.ग.

**झाडीबोली नाट्यसंमेलन समन्वयक** — डॉ. निळकंठ नरवाडे, सहायक प्राध्यापक, प.शै. मराठी विभाग, गो.वि.ग
मो. नं. ९५०३०८१७९०

**सहायक प्राध्यापक,** — डॉ. हेमराज निखाडे, पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग, गों. वि. गडचिरोली

**सहायक प्राध्यापक,** — प्रा. अमोल चव्हाण, पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग, गों. वि. गडचिरोली

### झाडीबोली नाट्यसंमेलनातील विविध उपक्रम

**झाडीबोली एकांकिका स्पर्धा**

झाडीबोली एकपात्री/नाट्यछटा स्पर्धा

झाडीबोली लोककला स्पर्धा

स्पर्धेचे पारितोषके — रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पारितोषकाचे स्वरूप राहील.

**१)झाडीबोली एकांकिका स्पर्धा** —प्रथम पारितोषक
रोखरक्कम — ६०००/—, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

**२) झाडीबोली एकांकिका स्पर्धा** —द्वितीय पारितोषक
रोख रक्कम — ३०००/—, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

**३) झाडीबोली एकांकिका स्पर्धा** —उत्तेजनार्थ पारितोषक स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

**एकपात्री अभिनय/ नाट्यछटा स्पर्धा**

**१) प्रथम एकपात्री अभिनय पारितोषक**
रोख रक्कम २०००/— स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

**२) द्वितीय एकपात्री अभिनय पारितोषक**
रोख रक्कम १०००/— स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

**३) उत्तेजनार्थ एकपात्री अभिनय पारितोषक**
स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

**उत्कृष्ट अभिनय पुरूष**
रोख रक्कम १५००/— स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

**उत्कृष्ट अभिनय महिला**
रोख रक्कम १५००/— स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

**उत्कृष्ट अभिनय उत्तेजनार्थ**
स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

## स्पर्धेचे नियम व अटी

१) सदर स्पर्धा झाडीबोली मराठी भाषेतच होईल ही स्पर्धा गोंडवाना विद्यापीठांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील महाविद्यालयांना लागू राहील.

२) सादरीकरणात कोणत्याही जातीचा, धर्माचा राजकीय व्यक्तीचा उल्लेख नको. सामाजिक तेढ उत्पन्न होईल असे सादरीकरण नको. तसे आढळून आल्यास प्रवेश थांबवण्याचा वा रद्द करण्याचा अधिकार नाट्य समितीस असेल.

३) स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेश अर्ज करण्यासाठी पुढील मोबाईल नंबर ९५०३०८१७९० वर संपर्क करावा. प्रवेश अर्ज भरून पाठविण्याची अंतिम तारीख ३० ऑक्टोबर, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० ०० वाजेपर्यंत असेल. यानंतर आलेल्या प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत.

४) स्पर्धेसाठी प्राचार्यांनी प्रमाणित केलेला साधा अर्ज भरून पाठवावा त्यासोबत दोन संहिता प्रती महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांचे ओळखपत्र असावेत.

५) एकांकीकेचा कालावधी कमीत कमी ३० मिनिटे व जास्तीत जास्त ४० मिनिटे असेल व एकपात्री अभिनयासाठी चा कालावधी कमीत कमी ५ मिनिटे असेल. वेळेचे बंधन काटेकोरपणे पाळणे ही प्रत्येक संघाची कर्तव्य असणार आहे.

६) सर्व कलावंतांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येतील.